सिडको
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

**महाराष्ट्र नगर रचना योजना नियम, १९७४ च्या नियम ४(१) अन्वये**

या जाहीर सूचनेद्वारे नैना क्षेत्राच्या मंजूर विकास योजनेतील सर्व संबंधित नागरिकांना कळविण्यात येते की, नैनाच्या मंजूर विकास आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी त्या हद्दीतील ता. पनवेल, जिल्हा रायगड येथील मौजे डेरवली, पळस्पे, शिरढोण, कुडावे, वडवली, तुरमाळे आणि नांदगाव गावांच्या काही भागात नगर रचना योजना क्र. ११ तयार करण्याचा इरादा सिडकोच्या संचालक मंडळाच्या दि. ०२.०४.२०२२ रोजीच्या ठराव क्र. १२५५१ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी दि. २२.०९.२०२२ रोजी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ६०(१) अनुसार घोषित केला असून, त्यासंबंधीची कलम ६०(२) खालील सूचना दि. १४.१०.२०२२ रोजीचे महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग २ यामध्ये तसेच दि. २०.१०.२०२२ रोजीच्या मराठी दैनिक सागर व द फ्री प्रेस जर्नल या इंग्रजी वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. तसेच सदर सूचना व न.र. परियोजनेची हद्द दर्शविणारा नकाशा नैना कार्यालय व सिडकोचे संकेतस्थळ या ठिकाणी प्रसिद्ध करण्यात आलेला आहे आणि संबंधित ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेला आहे.

सदरहू निर्णयास अनुसरुन, आता नैना प्रारुप नगर रचना योजना – ११ चा नियोजित मसूदा तयार करण्यात आला आहे. या प्रारुप नगर रचना योजनेच्या संदर्भात, महाराष्ट्र नगर रचना योजना, १९७४ च्या नियम ४(१) अन्वये प्राधिकरणातर्फे जमीन मालकांशी चर्चा करून संबंधिताना नियोजित मसुद्याप्रमाणे त्यांच्या अंतिम भूखंडाचे स्थळ, त्याचे क्षेत्र, आकार इत्यादी बाबी माहिती देणे आवश्यक आहे. या नगर रचना योजनेच्या प्रस्तावित तरतुदींसंदर्भात चर्चेसाठी सर्व संबंधित जमीन मालकांना दि. १९, २० व २१ एप्रिल २०२३ दरम्यान नैना कार्यालय, आठवा मजला, टॉवर क्र. १०, बेलापूर रेल्वे स्थानक संकुल, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ या ठिकाणी आमंत्रित करण्यात येत आहे.

दि. १९, २० व २१ एप्रिल २०२३ दरम्यान आयोजित न.र.प.-११ च्या हद्दीमध्ये समाविष्ट गावांतील जमीन मालकांच्या चर्चेचे वेळापत्रक खालील प्रमाणे आहे.

| दिनांक | वेळ | गावं |
|---|---|---|
| दि. १९ एप्रिल २०२३, बुधवार | सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजता | नांदगाव व कुडावे |
| दि. २० एप्रिल २०२३, गुरुवार | सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजता | डेरवली, पळस्पे आणि शिरढोण |
| दि. २१ एप्रिल २०२३, शुक्रवार | सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजता | वडवली व तुरमाळे |

सदर वेळापत्रक नैना कार्यालयाच्या सूचना फलकावर, संकेतस्थळावर तसेच संबंधित ग्रामपंचायत कार्यालये येथे उपलब्ध करण्यात आलेले आहे. न. र. परीयोजनेच्या हद्दी मध्ये समाविष्ट सर्व जमीन मालकांना सभेसाठी आमंत्रित करण्यात येत आहे. योजनेतील बऱ्याचश्या जमीन धारकांचे पत्ते उपलब्ध झाले नसल्याने ही जाहीर सूचना वैयक्तिक सूचना म्हणून विचारात घ्यावी ही विनंती.

तरी आपण स्वत: आपल्या जमिनीसंबंधी आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह आपणास दिलेल्या दिवशी उपस्थित राहावे जेणेकरून आपणास आपले म्हणणे सादर करता येईल. सदर नगर रचना परीयोजनेबाबतची माहिती पुढील ७ दिवस सिडकोच्या नैना कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध राहील व या कालावधीत जमीन मालकांना परीयोजनेबाबत सुचना सादर करण्याची तरतूद आहे. आपल्या सूचनेप्रमाणे प्रारुप नगर रचना योजनेच्या नियोजित मसूद्यात आवश्यक वाटल्यास दुरुस्ती/ फेरबदल करुन पुढील कार्यवाही प्राधिकरणामार्फत करण्यात येईल. तरी यासाठी संबंधितांनी कृपया समक्ष उपस्थित राहून शहराच्या विकासासाठी कृपया सहकार्य करावे.

आपला विश्वासू

**ठिकाण :** नवी मुंबई
**दिनांक :** ०३/०४/२०२३

**मुख्य नियोजनकार (नैना)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**

सिडको/जनसंपर्क/०११/२०२३-२४

सिडको
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

**महाराष्ट्र नगर रचना योजना नियम, १९७४ च्या नियम ४(१) अन्वये**

या जाहीर सूचनेद्वारे नैना क्षेत्राच्या मंजूर विकास योजनेतील सर्व संबंधित नागरिकांना कळविण्यात येते की, नैनाच्या मंजूर विकास आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी त्या हद्दीतील ता. पनवेल, जिल्हा रायगड येथील मौजे डेरवली, पळस्पे, शिरढोण, कुडावे, वडवली, तुरमाळे आणि नांदगाव गावांच्या काही भागात नगर रचना योजना क्र. ११ तयार करण्याचा इरादा सिडकोच्या संचालक मंडळाच्या दि. ०२.०४.२०२२ रोजीच्या ठराव क्र. १२५५१ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी दि. २२.०९.२०२२ रोजी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ६०(१) अनुसार घोषित केला असून, त्यासंबंधीची कलम ६०(२) खालील सूचना दि. १४.१०.२०२२ रोजीचे महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग २ यामध्ये तसेच दि. २०.१०.२०२२ रोजीच्या मराठी दैनिक सागर व द फ्री प्रेस जर्नल या इंग्रजी वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. तसेच सदर सूचना व न.र. परियोजनेची हद्द दर्शविणारा नकाशा नैना कार्यालय व सिडकोचे संकेतस्थळ या ठिकाणी प्रसिद्ध करण्यात आलेला आहे आणि संबंधित ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेला आहे.

सदरहू निर्णयास अनुसरुन, आता नैना प्रारुप नगर रचना योजना - ११ चा नियोजित मसूदा तयार करण्यात आला आहे. या प्रारुप नगर रचना योजनेच्या संदर्भात, महाराष्ट्र नगर रचना योजना, १९७४ च्या नियम ४(१) अन्वये प्राधिकरणातर्फे जमीन मालकांशी चर्चा करून संबंधिताना नियोजित मसुद्याप्रमाणे त्यांच्या अंतिम भूखंडाचे स्थळ, त्याचे क्षेत्र, आकार इत्यादी बाबी माहिती देणे आवश्यक आहे. या नगर रचना योजनेच्या प्रस्तावित तरतुदींसंदर्भात चर्चेसाठी सर्व संबंधित जमीन मालकांना दि. १९, २० व २१ एप्रिल २०२३ दरम्यान नैना कार्यालय, आठवा मजला, टॉवर क्र. १०, बेलापूर रेल्वे स्थानक संकुल, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ या ठिकाणी आमंत्रित करण्यात येत आहे.

दि. १९, २० व २१ एप्रिल २०२३ दरम्यान आयोजित न.र.प.-११ च्या हद्दीमध्ये समाविष्ट गावांतील जमीन मालकांच्या चर्चेचे वेळापत्रक खालील प्रमाणे आहे.

| दिनांक | वेळ | गावं |
|---|---|---|
| दि. १९ एप्रिल २०२३, बुधवार | सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजता | नांदगाव व कुडावे |
| दि. २० एप्रिल २०२३, गुरुवार | सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजता | डेरवली, पळस्पे आणि शिरढोण |
| दि. २१ एप्रिल २०२३, शुक्रवार | सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजता | वडवली व तुरमाळे |

सदर वेळापत्रक नैना कार्यालयाच्या सूचना फलकावर, संकेतस्थळावर तसेच संबंधित ग्रामपंचायत कार्यालये येथे उपलब्ध करण्यात आलेले आहे. न. र. परीयोजनेच्या हद्दी मध्ये समाविष्ट सर्व जमीन मालकांना सभेसाठी आमंत्रित करण्यात येत आहे. योजनेतील बऱ्याचश्या जमीन धारकांचे पत्ते उपलब्ध झाले नसल्याने ही जाहीर सूचना वैयक्तिक सूचना म्हणून विचारात घ्यावी ही विनंती.

तरी आपण स्वत: आपल्या जमिनीसंबंधी आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह आपणास दिलेल्या दिवशी उपस्थित राहावे जेणेकरून आपणास आपले म्हणणे सादर करता येईल. सदर नगर रचना परीयोजनेबाबतची माहिती पुढील ७ दिवस सिडकोच्या नैना कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध राहील व या कालावधीत जमीन मालकांना परीयोजनेबाबत सुचना सादर करण्याची तरतूद आहे. आपल्या सूचनेप्रमाणे प्रारुप नगर रचना योजनेच्या नियोजित मसूद्यात आवश्यक वाटल्यास दुरुस्ती/ फेरबदल करुन पुढील कार्यवाही प्राधिकरणामार्फत करण्यात येईल. तरी यासाठी संबधितांनी कृपया समक्ष उपस्थित राहून शहराच्या विकासासाठी कृपया सहकार्य करावे.

आपला विश्वासू

**ठिकाण :** नवी मुंबई
**दिनांक :** ०३/०४/२०२३

**मुख्य नियोजनकार (नैना)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/०११/२०२३-२४